PUBLICATION – LOKMAT
DATE – APRIL 21, 2010
PAGE NO. – 9

# सुपर प्रिमीयम कॉटन वेअर श्रेणीत कॉटनकिंगचे पदार्पण

**पुणे, दि. २० :** कॉटनकिंगतर्फे कॉटनकिंग रोयाल या शर्टच्या नवीन मालिकेद्वारे सुपर प्रिमीयम कॉटन वेअर श्रेणीत पदार्पण केले आहे, अशी माहिती संचालक प्रदीप मराठे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. मराठे म्हणाले, या नव्या वस्त्रमालिकेत सुरुवातीला कॉटन आणि लिनन दोन नैसर्गिक धाग्यांचा वापर करुन प्रीमियम शर्टची निर्मिती करण्यात येणार असून त्यातून ग्राहकांना एक वेगळी अनुभुती मिळणार आहे. उन्हाळ्यात अतिनील किरणांपासून रक्षण करण्यासाठी हे शर्ट उपयुक्त ठरणारे आहेत. सुती कपडा घाम शोषून घेतो आणि हवा खेळती राहते. त्याला लिननची जोड मिळाल्याने अतीनील किरणांपासून संरक्षण मिळते. कॉटनकिंगच्या राज्यातील २७ दालनांतून २३ एप्रिलपासून विक्रीसाठी ही श्रेणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येत्या काळात नागपूर व मुंबईवर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. या वर्षी आर्थिक मंदी असूनही २६ टक्के विकास साधण्यात यश मिळाले असून पुढील वर्षासाठी ५० टक्के विकासाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, असे मराठे यांनी सांगितले.